RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ८, अंक १०५] सोमवार, नोव्हेंबर २१, २०२२/कार्तिक ३०, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २१५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२.

**अधिसूचना**

**प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९.**

क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१४३ /पदुम-४.—ज्याअर्थी, प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनिय, २००९ (२००९ चा २७) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) अन्वये गाई व म्हशी यांच्याकरिता ज्याला अनुसूचित रोग असल्याचे घोषित केले आहे त्या लम्पी चर्म रोगाच्या (एलएसडी) बाबतीत, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक संकीर्ण- २०२०/प्र.क्र.५३ /पदुम-४, दि. ८ सप्टेंबर, २०२२ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) नुसार, संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे, "नियंत्रित क्षेत्र" म्हणून घोषित केले आहे;

आणि ज्याअर्थी, सध्या, राज्याच्या अमरावती व नाशिक या महसुली विभागांमधील गुरांना मोठ्या प्रमाणात संसर्ग झाला असल्याचे आणि गुरे मृत्युमुखी पडली असल्याचे कळविण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यातील एकूण गुरांपैकी जवळजवळ ९८% गुरांना, लम्पी चर्म रोग (एलएसडी) प्रतिबंधक लस देण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ६ व ७ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिसूचनेमध्ये, पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेमधील,—

१. परिच्छेद (क) ऐवजी, पुढील परिच्छेद दाखल करण्यात येईलः—

"(क) लम्पी चर्म रोगाचे (एलएसडी) नियंत्रण, प्रतिबंध किंवा निर्मूलन करण्यात येईल आणि,-

(एक) त्यांच्या ठिकाणापासून साखर कारखान्यापर्यंत आणि ऊसाच्या शेतापासून साखर कारखान्यापर्यंत ने-आण करण्यात येणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या गुरांखेरीज;

(दोन) गुरे ज्या ठिकाणी ठेवण्यात आली आहेत त्या ठिकाणापासून अमरावती व नाशिक महसुली विभागांच्या जिल्ह्यांमध्ये किंवा जिल्ह्यांबाहेर, सर्व प्रकारच्या गुरांची ने-आण करण्यास मनाई करण्यात येईल; आणि तसेच,

(तीन) पुणे, औरंगाबाद, मुंबई व नागपूर महसुली विभागांच्या जिल्ह्यांमध्ये केवळ संक्रमित नसलेल्या आणि लसीकरण केलेल्या गुरांची वाहतूक करण्यास परवानगी देण्यात येईल, परंतु, शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले आरोग्य प्रमाणपत्र सोबत बाळगण्यात येईल, आणि त्यासाठी विभागाकडून स्वतंत्र आदेश काढण्यात येईल.

२. परिच्छेद ( ख) मधील, "व म्हशी" हा मजकूर वगळण्यात येईल.

३. परिच्छेद (ग) मधील, "व म्हशींचा" हा मजकूर वगळण्यात येईल.

४. परिच्छेद (घ) मधील, "व म्हशींना" हा मजकूर वगळण्यात येईल".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जगदीश गुप्ता,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 21st November, 2022.

*NOTIFICATION*

Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009.

No. DIS-2022/C.R.143/ADF-4.—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Notification, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department, No. SANKIRNA-2020/C.R.53/ADF-4, dated the 8th September, 2022 (herein after referred to as "the said Notification"), declared the whole State of Maharashtra as the "Controlled Area" in respect of the Lumpy Skin Disease (LSD), which is a Scheduled Disease declared under the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (27 of 2009) (herein after referred to as the "said Act") for cattle and buffaloes;

And whereas, presently large number of infected cattle and deaths of cattle are reported in Amravati and Nashik revenue divisions of the State;

And whereas, almost 98% cattle population of the State has been vaccinated against the Lumpy Skin Disease (LSD).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sections 6 and 7 of the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said notification as follows namely:—

In the said notification,—

1. For the paragraph (a), the following paragraph shall be substituted,—

"(a) control, prevent or eradicate Lumpy Skin Disease (LSD) and prohibit the movement of all the cattle,

(*i*) except the cattle of sugarcane labourers and farmers, moving from their place to sugar factories and farm of sugarcane to sugar factory;

(*ii*) the cattle from the place where they are kept to any other place within or outside the districts of Amravati and Nashik Revenue division; and also

(*iii*) transportation of only non-infected and vaccinated cattle within the districts of Pune, Aurangabad, Mumbai and Nagpur Revenue division shall be permitted, provided accompanied with health certificate issued by the Competent Authority of the Animal Husbandry Department of the Government, and for which Separate order will be issued by the Department.

2. In paragraph (b), the words "and buffaloes" shall be deleted.

3. In paragraph (c), the words "and buffaloes" shall be deleted.

3. In paragraph (d), the words "and buffaloes" shall be deleted."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

JAGDISH GUPTA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.